بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# सत्यनिष्ठ खिलाफत परंपराच्या समर्थनाचे प्रतिबिंब करणारे लक्षवेधक प्रसंगांचा उल्लेख

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक २६ मे २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहाच्या पठनानंतर हुजूर अनवर म्हणालेः

जेव्हा अल्लाहने अपेक्षित मसीह (अ.स) यांना खबर दिली की त्यांची आता या जगातून प्रस्थान करण्याची वेळ जवळ आली आहे, तेव्हा त्यांनी जमाअतला उद्देशून म्हणाले: अल्लाह दोन प्रकारची प्रभुसत्ता प्रदर्शित करतो. पहिली, आपल्या संदेष्ट्याच्या हस्ते पहिली प्रभुसत्ता प्रकट करतो आणि दुसरी, ज्या वेळी प्रेषिताच्या मृत्यूनंतर अडचणी निर्माण होतात आणि शत्रू आनंदी होतात आणि परिस्थिती बिघडली आहे असे समजतात आणि विश्वास ठेवतात की आता ही जमाअत नष्ट होईल आणि स्वतः जमाअतच्या लोकांमध्ये देखील संकोच निर्माण होतो आणि ते कमजोर पडू लागतात आणि अनेक दुर्दैवी लोक धर्मत्यागाचा मार्ग स्वीकारतात, तेव्हा सर्वशक्तिमान अल्लाह आपली दुसरी प्रभुसत्ता प्रकट करतो आणि पतन होत असलेली जमाअतला स्वतः सावरतो. म्हणून जो शेवटपर्यंत संयम बाळगून टिकून राहतो तो सर्वशक्तिमान ईश्वराचा हा चमत्कार पाहतो जसा हजरत अबू बकर सिद्दिक (र.ज.) च्या काळात घडला होता जेव्हा प्रेषित मुहम्मद (स.) च्या मृत्यूला अकाली मृत्यू मानले जात होते आणि बरेच बेदुइन (अज्ञानी) धर्मत्यागी बनले होते आणि प्रेषिताचे सोबती देखील दुःखी होऊन वेड्यासारखे झाले होते. मग परमेश्वराने हजरत अबू बकर सिद्दीक यांना उभे केले आणि पुन्हा आपल्या प्रभुसत्ताचे उदाहरण त्यांच्या हस्ते प्रदर्शित केले आणि इस्लामचा नाश होण्यापासून वाचवले आणि त्यांनी दिलेले वचन पूर्ण केले जो हा होता.....

وَلَيُمَكِّنَنَّ لَهُمْ دِيْنَهُمُ الَّذِي ارْتَضٰى لَهُمْ وَلَيُبَدِّلَنَّهُمْ مِّنْ بَعْدِ خَوْفِهِمْ أَمْنًا

अर्थात- आणि तो निश्चितच त्यांच्यासाठी त्यांचा असा धर्म प्रस्थापित करील जो त्यांच्यासाठी त्याने निवडला आहे आणि त्यांच्या भयपूर्ण अवस्थेच्या बदल्यात त्यांच्या सुरक्षितता आणि सुखशांती प्रदान करील.

इजिप्त आणि कनानच्या वाटेवर हजरत मुसा यांच्या काळात हेच घडले होते जेव्हा ते इस्त्रायली लोकांना त्यांच्या वचन दिलेल्या स्थानापर्यंत पोहोचवण्याआधीच मरण पावले. मग इस्त्रायली लोकांमध्ये शोकांतीका पसरली आणि ते चाळीस दिवस रडत होते.

अपेक्षित मसीह (अ.स) म्हणाले की तुमच्यासाठी दुसरी प्रभुसत्त पाहणे आवश्यक आहे आणि ते येणे तुमच्यासाठी चांगले आहे कारण ती शाश्वत आहे ज्याची साखळी पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत खंडित होणार नाही आणि ती दुसरी प्रभुसत्ता माझ्या प्रस्थानानंतर प्रकट होईल. आणि माझ्या निर्वाणानंतर परमेश्वर ती दुसरी प्रभुसत्ता तुमच्यासाठी पाठवेल जी बराहिन-ए-अहमदियामध्ये वचन दिल्याप्रमाणे नेहमी तुमच्यासोबत असेल.

म्हणून अपेक्षित मसीह (अ.स) यांचे निधन झाले तेव्हा त्यांच्या वचनानुसार अल्लाहने मौलाना नुरुद्दीन साहिब यांच्या हाताखाली जमाअत एकत्र केली. काहीं लोकांची इच्छा होती की आता जमाअत अंजुमनच्या व्यवस्थापनाखाली मार्गस्थ व्हावी परंतु त्यांनी या उपद्रवाचे सुरुवातीलाच पाय मोडले. पुढे हजरत खलीफतुल-मसीह द्वितीय (र.ज.) खलिफा पदावर आरूढ झाले तेव्हा देखील दांभिक लोकांनी अराजकता निर्माण करण्याचे अतोनात प्रयत्न केले परंतु परमेश्वराने श्रद्धावंतांना एक हातावर जमा केले आणि विरोधींच्या पदरात अपयश आले. त्यांच्यानंतर तृतीय खीलाफतचा काळ सुरु झाला आणि त्यानंतर चौथ्या खीलाफत चा दौर आला.

यानंतर हुजूर अनवर यांनी अत्यंत विनम्रतेने सांगितले की, मग अल्लाहने मला या पदावर आरूढ करून पुन्हा एकदा हजरत अपेक्षित मसीह यांना दिलेल्या वचनानुसार जमाअतला प्रगतीच्या मार्गावर अग्रसर केले. शत्रूने फूट पाडण्याचे अनेक प्रयत्न केले. अहमदींना शहीद केले अनेक सांसारिक लाच देऊन त्यांच्या श्रद्धेची चाचणी करू लागले, परंतु अल्लाह जगभरातील अहमदींना श्रद्धेत वाढवत राहिला.

अहमदियांचे खिलाफतशी असलेले नाते केवळ सर्वशक्तिमान अल्लाहच निर्माण करू शकतो, असे प्रेम आणि प्रामाणिकपणाचे नाते निर्माण करण्याची ताकद कोणत्याही मानवामध्ये नाही. मी ज्या देशात जातो त्या प्रत्येक देशात ही प्रेक्षणीय रूप दिसतात आणि केवळ तोंडीशब्द नव्हे तर आता हे क्षण कॅमेऱ्यामध्ये कैद होऊन आहेत आणि एम.टी.ए हे क्षण लोकांना दाखवते आणि त्याला पाहून विरोधीदेखील हे बोलण्यास मजबूर झाले आहेत अल्लाहची मदत तुम्हाला लाभत आहे आणि मला दररोज येणारे हज्जारो पत्र खीलाफतशी प्रेम आणि स्नेहाचे अप्रतीम उदाहरण आहे. आणि परमेश्वर त्यांच्यामनात खीलाफतचे प्रेम निर्माण करतो आणि ते कशाप्रकारे जुडून राहतात याचे काही नमुने अनुयायींच्या पत्रव्यवहाराद्वारे प्राप्त प्रसंगांना प्रस्तूत करून दर्शवू इच्छितो.

तंझानियातील एक शिक्षक लिहितात की नमाजानंतर एके दिवशी त्यांनी मशिदीच्या पायऱ्यांवर एक स्त्री पाहिली जिने सांगितले की प्रार्थना करुन घेण्यासाठी आली आहे, जसे

की बिगरअहमदी लोकांमध्ये दम दुरूदची प्रथा आहे. तथापि, आम्ही तिला जमाअतबद्दल माहिती दिली आणि तिच्यासाठी प्रार्थना देखील केली. महिलेने मला सांगितले की तिला एक स्वप्न पडले आहे ज्यामध्ये एका लांब दाढी असलेल्या पुरुषाने मला धर्म समजावून सांगितला, ज्यावर तिची अहमदिया समुदायाशी ओळख करून देण्यात आली आणि अपेक्षित मसीह (अ.स) आणि खलिफांची फोटो तिला दाखविण्यात आली ज्यानंतर हजरत अपेक्षित मसीह यांना पाहून ती म्हणाली हेच थोर पुरुष माझ्या स्वप्नात आले होते.

इंडोनेशियातील एका भागातील रहिवासी असलेले अब्दुल्लाह साहिब जमाअतच्या संपर्कात होते आणि आमच्या धर्मप्रचारकाच्या जवळ असल्याने विरोधकांनी त्यांच्यावर आरोप केले आणि त्यांना त्यांच्या मशिदीत येण्यास मनाई केली. त्याना स्वप्न पडले की ते एका चक्रवादळामध्ये अडकले आहेत ज्यामुळे त्याचा नाश होईल. नंतर त्याने हजरत अपेक्षित मसीहाचे चित्र पाहिले आणि सांगितले की या संताने मला त्या चक्रवादळातून वाचवले. त्यांच्या मुलालाही स्वप्न पडले आणि नंतर त्याने तिसरे, चौथे खलीफा आणि माझी फोटो पाहून म्हणाला की यांनी मला वाचवले होते. तद्नंतर अब्दुल्लाह साहेब यांनी आपल्या परिवारासह जमाअतमध्ये सामील झाले.

हुजूर अनवर म्हणाले: अहमदी होण्यापूर्वी मालीच्या एका महिलेला स्वप्नात दोन आवाज ऐकू यायचे, एक कुरआन पठणाचे आणि दुसरा तिथल्या मुअल्लिम साहेबांची आवाज. जेव्हा तिने जमाअतच्या रेडिओवर माझे प्रवचन आणि इतर कार्यक्रम ऐकले, तेव्हा ती म्हणाली की हे तेच आवाज आहे जे मी स्वप्नात ऐकत होते आणि मग तिने दीक्षा घेऊन अहमदी झाली.

कॅमेरूनमधील एका तरुणाचे म्हणणे आहे की, त्याने काही वर्षांपूर्वी दोन थोर पुरुषांना स्वप्नात पाहिले. काही दिवसांनंतर एका तरुणाला बाजारामध्ये जमाअतचे पॅम्प्लेट वाटताना पाहिले. या पॅम्फ्लेटमध्ये हजरत अपेक्षित मसीह (अ.स.)चे चित्र होते, जे मला स्वप्नात पाहिले होते. मी जमाअतशी संपर्क साधला, साहित्य वाचले, आणि वाचताना मला दुसरे चित्र दिसले, जे सध्याच्या खलिफाचे होते, ज्यांनी मला नमाज अदा करण्याचे स्वप्नात सांगितले होते. मी अहमदियाचा स्वीकार केल्यानंतर, त्या भागाचा प्रमुख मरण पावला, म्हणून मला त्या क्षेत्राचा प्रमुख नियुक्त केला. जमाअतमध्ये सामील झाल्यामुळे मला हे सर्व आशीर्वाद प्राप्त होत आहेत, असे त्यांनी सांगितले.

गिनी-बिसाऊ येथील आयेशा मारिया साहिबा या महिलेच्या दोन मुलांनी अहमदियत स्वीकारलं. तिचा मोठा भाऊ जमाअतच्या विरोधात असून तोच तिच्या कुटुंबाची संगोपन करत होता. तो भाऊ म्हणाला, जर का तुम्ही अहमदियत सोडले नाही तर मी तुमच्याशी माझं नातं मोडेन. मुलांनी सांगितले की अल्लाह आमच्यासाठी पुरेसा आहे आणि आम्ही कोणत्याही किंमतीत अहमदिया सोडणार नाही. दोन दिवसांनी, स्वप्नात पांढरे कपडे घातलेल्या एका पांढऱ्या दाढीवाल्या माणसाने त्याना सांत्वन दिले की

काळजी करू नकोस, तुझे मुले सर्वात वरचे प्रभुत्व प्राप्त करतील. तिने मिश्नहाऊज जाऊन माझा फोटो पाहिला आणि म्हणाली की हाच तो व्यक्ति आहे जो स्वप्नात मला धीर देण्यासाठी आला होता. दीक्षा घेतल्यानंतर ती खूप सक्रिय अहमदी झाली आहे.

केनियातील भाटी या भागात ख्रिश्चन बहुसंख्य लोक आहेत. एके दिवशी मुहम्मद अब्दी नावाचा एक व्यक्ती, जो जमाअतचा तीव्र विरोधी होता, तो आमच्या केंद्रात नमाज पढण्यासाठी आला. जमाअतबद्दल त्याला माहिती दिली. काहीं दिवसांनंतर तो मुअल्लिम साहेब च्या घरी आला त्यावेळी माझा प्रवचन एम.टी.ए वर येत होता. प्रवचन ऐकल्यानंतर त्याने दीक्षा स्वीकारण्याची इच्छा प्रकट केली. याविषयी विचारल्यावर तो म्हणाला, काल रात्री जेव्हा तो झोपीतून उठून अंगणात गेला तेव्हा त्याला आकाशात एक चमकदार वस्तू दिसली, ज्याचा त्याच्यावर खोल परिणाम झाला. आणि मला प्रवचनमध्ये पाहून तो चित्र कोणाचा आहे ते मी जाणवले म्हणून तो आपल्या परिवारासह जमाअतमध्ये सामील झाला.

सिरा लिओनमधील इब्राहिम नावाच्या माणसाने एम.टी.ए. वर माझे प्रवचन ऐकले आणि मौलवींची शिकवण खोटी असल्याचे उघडपणे सांगू लागला. मी स्वतः ऐकले आहे की अहमदिया जमाअतचे इमाम त्यांच्या प्रवचनात कुरआन आणि अहदीसचे वर्णन करतात. त्यांचा कलमा देखील तोच आहे म्हणून अहमदिया जमाअत खोटी असू शकत नाही आणि त्यांनी अहमदियाचा स्वीकार केला.

काँगो किन्शासा येथील एका व्यक्तीने, अहमद साहिब, आपल्या आठ लोकांच्या कुटुंबासोबत दीक्षा घेतली आणि प्रचाराचा काम देखील सुरू केला, परिणामी ६२ लोक अहमदी झाले. त्यांच्या अहमदी होण्याचे मुख्य कारण खलिफा आणि खिलाफत परंपरा ठरली. पुढे त्यांच्या प्रचारामुळे त्याप्रदेशातही जमाअत खूप वाढली.

अमीर साहिब काँगो किन्शासा लिहितात की काँगोमधील जमाअतच्या रेडिओ स्टेशन व्यतिरिक्त, प्रबोधन आणि प्रचार कार्यक्रम आणि शुक्रवारचे प्रवचन २३ वेगवेगळ्या रेडिओ स्टेशनवर प्रसारित केले जातात. एका स्थानिक ख्रिश्चन डॉक्टरने सांगितले, मी प्रवचन नियमितपणे ऐकतो आणि मी विनंती करतो की त्याचे स्थानिक भाषेत भाषांतर केले जावे जेणेकरून अधिक लोकांना फायदा होईल. इस्लाम आणि अहमदियाचा संदेश देण्यासाठी अल्लाह अशा प्रकारे व्यवस्था करत आहे.

हुजूर अनवर यांनी त्रिनिदाद, किरगिझस्तान, पराग्वे आणि बांगलादेशातील घटना सांगितल्या आणि म्हणाले की, एकवेळ त्यांची मने उघडतील आणि ते अहमदियत स्वीकारतील. खिलाफतचे आशीर्वाद कायमस्वरूपी आहे.

या घटना खिलाफत ए अहमदियासाठी अल्लाहच्या समर्थनाचा पुरावा आहेत आणि अपेक्षित मसीह (अ.स) यांनी पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांची अधीनतेखाली जगाला एकमेव  राष्ट्र बनवायचे होते या सत्याचा पुरावा आहे. दुर्गम परिस्थितीत असूनही केवळ

खिलाफत अहमदिया हीच एकमेव अशी परंपरा आहे जी जगभरात इस्लामचा प्रचार प्रसार करत आहे. आणि हीच परमेश्वराकडून आम्हाला लाभलेली सहाय्यता आहे.

सर्वशक्तिमान अल्लाहच्या वचनानुसार आणि पवित्र प्रेषित (अल्लाह सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या भविष्यवाणीनुसार, प्रेषित्तवाच्या मार्गावर खिलाफत परंपरा चिरस्थायी टिकून राहील आणि कोणताही शत्रू त्याचा काहीही बिघाड करू शकणार नाही. म्हणून आपल्या श्रद्धेत वाढ करत राहा, खिलाफतशी अतुट संबंध प्रस्थापित करा आणि कोणत्याही प्रकारचे त्याग करण्यास अजिबात संकोच करू नका. अल्लाह आम्हाला हे सर्व कार्य पूर्ण करण्याचे सामर्थ्य देवो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰهِ ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ أَنْ لَّآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ،
عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِي الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ
لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ ۔